# Sample Question Paper (2026-27)

# Subject - Marathi

# Subject Code - (009)

# Class – X

**Time: 3 hrs.** **Marks: 80**

**सर्वसाधारण सूचना :**

1. या प्रश्नपत्रिकेत - अ, ब, क, ड - असे चार विभाग आहेत व 11 पृष्ठे आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन - 15 गुण

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

संध्याकाळची वेळ. आश्रम शाळेच्या पटांगणात मुले खेळत होती. राजेश मात्र झेंड्याच्या खांबाला टेकून एकटाच बसला होता. त्याच्या आईवर तो रागावला होता. त्याचे वडील – आप्पा - यांनी आज दुपारीच त्याला आश्रमशाळेत पोहोचवलं होतं. पाचवीच्या वर्गात त्याचं नाव घातलं होतं. त्याला यायचं नव्हतं. तो आईला विनवून म्हणाला, "आई... आप्पाला नको म्हणून सांग ना... तुला सोडून मला नाही जायचं शिकायला..." आई त्याच्या पाठीवरून, डोक्यावरून मायेने हात फिरवत म्हणाली, "बाळ, तुला खूप मोठं व्हायचं आहे. तू खूप मोठ्ठा साहेब व्हावा, हे आईचं स्वप्नं आहे... बाळ, आईचं स्वप्न पूर्ण नाही करणार? हो ना.. मग त्यासाठी खूप शिकावं लागेल. त्यासाठी आईपासून थोडे दिवस दूर जावं लागेल. तुला काय वाटतं? मी तुझ्यापासून दूर आहे? नाही बाळ, मी सदैव तुझ्याजवळच आहे. माय-लेकरू यांचं नातं चिखल पाण्यासारखं असतं. या दोघांना कधी वेगळं झालेलं पाहिलं आहे? नाही ना..." राजेश पुढे म्हणाला, “आई, मला भाकर चुरून कोण खाऊ घालणार? मला झोपतांना कोण थोपटणार? माझी बाजू कोण घेणार? मला पोटाशी कोण धरणार?" असे अनेक प्रश्न विचारले. आई हसत म्हणाली, "बाळ, शिकून मोठं होण्यासाठी आताच तुला मोठं व्हावं लागेल. आईचं बोट सोडून जगावं लागेल, स्वावलंबी व्हावं लागेल..." "पण आई, मी एकटा कसा राहू?" "तू एकटा कुठे आहेस बाळ!. तुझे दीड-दोनशे भाऊ तुझ्या सोबत असतील... ऊठ बरं... जा खेळायला.....” राजेशच्या वर्गातला संतोष त्याला खेळायला बोलवत

होता. राजेशला त्याची चूक लक्षात आली. त्याने डोळे पुसले आणि उड्या मारत खेळणाऱ्या मुलांमध्ये गायब झाला.

**अ) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा. (कोणतेही 5)** **(5 x 1 = 5)**

**I.** राजेश कुठे बसला होता?

A) वर्गात B) वडिलांसोबत C) झेंड्याच्या खांबाला टेकून D) झाडाखाली

**II.** राजेश आश्रमशाळेत का आला?

A) त्याला स्वतःला यायचं होत B) मित्रांसोबत राहण्यासाठी

C) आई-वडिलांनी शिक्षणासाठी पाठवले D) खेळायला

**III.** राजेशला आश्रमशाळेत का यायचं नव्हतं?

A) तिथे अभ्यास कठीण होता. B) आईपासून दूर राहायचं नव्हतं.

C) मित्र नव्हते. D) तो आजारी होता.

**IV.** आईच्या मते, राजेशने आश्रमशाळेत का शिकावं?

A) मित्र मिळावेत म्हणून B) खेळ चांगला यावा म्हणून

C) आईचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी D) सुट्टी मिळावी म्हणून

**V.** आईने राजेशला काय होण्यासाठी प्रोत्साहन दिलं?

A) चांगला खेळाडू B) मोठ्ठा साहेब C) शेतकरी D) डॉक्टर

**VI.** “माय-लेकरू यांचं नातं चिखल पाण्यासारखं असतं” या वाक्याचा अर्थ —

A) नातं घट्ट आणि वेगळं न होणारं. B) नातं कमकुवत आहे.

C) नातं तुटक आहे. D) नात्यात सतत भांडण असतं.

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3)** **(CBQ)** **(3 x 1= 3)**

**I.** राजेश एकटाच का बसला होता?

**II.** राजेशला शेवटी काय जाणवले?

**III.** राजेशने आईला कोणकोणते प्रश्न विचारले?

**IV.** शेवटी राजेश काय केले?

**प्रश्न 2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

हळूहळू चालत राहिला तो, अंधार दाटला भोवती,
स्वार्थाच्या वादळांनी झाली, मनात खळबळ ती.
तरीही आशेची ठिणगी होती पेटली, अंतरी वारा,
हातात धरून सत्यदीप तो, पुढे चालत होता सारा.
रस्त्यात भेटल्या लोभाच्या, मोहक चमचमती वाटा,
कानात कुजबुजत म्हणाल्या," हेच सुखाचे खरे दाता !"
पण मनातल्या एका आवाजाने, त्याला खरे सांगितले,
"योग्य मार्गच उजळतो जीवन, चुकीचे सारे ढळते."
अखेर प्रकाशाच्या दारी, तो स्वत:ला पोहोचवितो,
सत्य, प्रामाणिकता, परिश्रम—यांतच आनंद शोधितो.
अंधार कितीही दाट असो, सत्याचा दीप जो लावतो,
नीतीच्या वाटेने चालणारा, शेवटीच खरा जिंकतो.

**अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही4) (4 x 1= 4)**

**I.** कवितेतील नायकाच्या सभोवती काय होते?

A) दाटी B) गर्दी C) अंधार D) प्रकाश

**II.** 'आशा' या शब्दाचा विरुद्ध अर्थ खालीलपैकी कोणता?

A) निराश B) उदास C) आनंद D) निराशा

**III.** कवितेतील नायकाच्या हातात काय आहे?

A) नंदादीप B) सत्यदीप C) दिवा D) जीवनज्योत

**IV.** रस्त्यात भेटलेल्या मोहक व चमचमणाऱ्या कोण?

A) लोभाच्या वाटा B) पायवाटा C) आकर्षक वाटा D) जीवनवाटा

**V.** कवितेतील नायक अखेर कोठे पोहोचतो?

A) स्वत:च्या घरी B) प्रकाशाच्या दारी C) घराच्या अंगणात D) शेताच्या कुंपणात

**ब) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3x1=3)**

**(CBQ)**

**I.** कवितेतील नायक कशात आनंद शोधतो?

**II.** जीवनात खरेपणाने कोण जिंकतो?

**III.** अंधार कितीही गडद असला, तरीही काय केले पाहिजे?

**IV.** जीवनात चुकीच्या गोष्टीचे काय होते?

**V.** 'हेच सुखाचे खरे दाता' कोणास म्हटले आहे?

## विभाग – ब – व्याकरण – 20 गुण

**प्रश्न 3 अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** **(4x1=4)**

**I.** गुरुजी फळ्या<u>समोर</u> उभे होते. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

A) नाम B) क्रियापद C) शब्दयोगी अव्यय D) उभयान्वयी अव्यय

**II.** <u>काल</u> दुपारी गारांचा पाऊस पडला. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

A) सामान्य नाम B) सर्वनाम C) क्रियाविशेषण अव्यय D) क्रियापद

**III.** झाडाला खत घातले ....... फुले आली नाहीत. (रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय वापरा)

A) आणि B) की C) पण D) म्हणजे

**IV.** ............ पुराचे पाणी त्याच्या घरात शिरले. (रिकाम्या जागी योग्य केवलप्रयोगी अव्यय वापरा)

A) छे ! B) वा! C) शी! D) अरेरे!

**V.** नेपोलियन अद्वितीय योद्धा होता. (विशेषण ओळखा)

A) नेपोलियन B) होता C) अद्वितीय D) योद्धा

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3 x 1= 3)**

**I.** मुलाने पुस्तक वाचले आहे. (भविष्यकाळातील वाक्य तयार करा)

**II.** मला मुख्याध्यापकांची भीती वाटत आहे. (काळ ओळखा)

**III.** उद्या मी पावसात खेळेल. (भूतकाळातील वाक्य तयार करा)

**IV.** खालील वाक्यातील भूतकाळी वाक्य शोधा.

A) रस्ता एकेरीच आहे.    B) रस्ता एकेरीच असेल.

C) रस्ता एकेरीच होता.    D) रस्ता एकेरीच असणार आहे.

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)    (CBQ)    (3 x 1= 3)**

**I.** आम्ही तुमचे उपकार कसे विसरू?    (विधानार्थी वाक्य बनवा)

**II.** विश्वाचा पसारा अमर्याद आहे.    (नकारार्थी वाक्य बनवा)

**III.** अरेरे! केवढ्या जोरात आदळला हा!    (वाक्याचा प्रकार ओळखा)

**IV.** आवडती वस्तू हरवल्यास प्रत्येकाला दुःख होते.    (प्रश्नार्थी वाक्य बनवा)

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.    (कोणतेही 2)    (2 x 1= 2)**

**I.** खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ते ओळखा.

पडवळ, भाज्या, शेंगा, थाळ्या.

**II.** <u>वाहने</u> सावकाश चालली होती.    (अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा)

**III.** 'मिरची' या शब्दाच्या अनेकवचनाचा शब्द लिहा.

**प्रश्न 4.  अ] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. [कोणतेही 2]    (2 x 1= 2)**

**I.** खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.

A) हिरवळ    B) शेती    C) डोंगर    D) टेकडी

**II.** लिंग विचारानुसार गटात न बसणारी शब्द जोडी ओळखा.

A) दास – दासी    B) रस्ता - रस्ते    C) म्हैस - रेडा    D) युवक - युवती

**III.** पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता?

A) फळा    B) माणूस    C) गवत    D) वीट

**ब] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2 x 1= 2)**

**I.** समानार्थी शब्दाची अयोग्य जोडी ओळखा.

A) झेंडा - ध्वज B) अपाय - उपाय C) स्तंभ -खांब D) धवल - पांढरे

**II.** गटात न बसणारा शब्द ओळखा.

A) सूर्य B) शशी C) भास्कर D) सविता

**III.** खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

A) कामगार B) कौशल्य C) कसब D) निपुणता

**क] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2 x 1= 2)**

**I.** खालीलपैकी विरुद्ध शब्दांची योग्य जोडी कोणती?

A) देव - दानव B) छोटा- लहान C) दूर - लांब D) तिमिर - काळोख

**II**. 'आस्था' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता?

A) सहिष्णुता B) आवश्यकता C) प्रथा D) अनास्था

**III.** 'आसक्ती' 'या शब्दासाठीचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता?

A) सक्ती B) आकर्षण C) जबरदस्ती D) विरक्ती

**ड] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2 x 1= 2)**

**I.** 'त्रैलोक्य' या सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा व पर्याय निवडा.

A) वैकल्पिक द्वंद्व समास B) अव्ययीभाव समास C) समाहार द्वंद्व समास D) द्विगू समास

**II.** खालीलपैकी गटाबाहेरचा शब्द कोणता?

A) प्रतिक्षण B) आजन्म C) नवरात्र D) घरोघरी

**III**. खालीलपैकी इतरेतर द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते?

A) पंचपाळे B) मातापिता C) दहावीस D) दररोज

# विभाग –'क' – पाठ्यपुस्तक आधारित – 30 गुण

**प्रश्न 5. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3 x 1= 3)**

I. कादंबरी वाचकांची उत्कंठा कशाप्रकारे वाढवते?

II. डॉ. माशेलकरांच्या आईला त्यांच्या शिक्षणासाठी कोणाकडून मदत मिळाली?

III. पावडेकाकांची पावले कशी होती?

IV. शालीन जग गमावून बसण्याचा धोका केव्हा संभवतो?

V. अब्दुल कोणत्या विचाराने हळवा झाला?

**ब]] खालीलपैकी तीन वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 3)**

**(3 x 1= 3)**

I. नुसता ---- भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहाणार.

A) वायू B) वारा C) हवा D) समीर

II. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा ---- रंग ठरतो.

A) गोरा B) गुलाबी C) निळा D) काळा

III. आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन ---- होता.

A) आनंदी B) खूश C) दुःखी D) समाधानी

IV. मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही ---- उत्तम होऊ शकत नाही.

A) गोष्ट B) कलाकृती C) कला D) मालिका

V. शालीमुळे शालीनता येत असेल तर मी ---- होईन.

A) कर्जबाजारी B) भिकारी C) साहित्यिक D) लेखक

**क) खालील प्रश्नाचे ४० ते ५० शब्दात उत्तर लिहा. (कोणतेही 1)** **(CBQ)** **(1 x 3= 3)**

**I.** 'शाल व शालीनता' यांचा पाठाधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**II.** 'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी तुम्ही तीन उपाय सुचवा.

**III.** निरंजन 'खरा नागरिक' कसा ते स्पष्ट करा.

**ड) खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचारांशी जुळतो ते लिहा.** **(CBQ)** **(5 x 1= 5)**

(नौबत झडणे, स्वप्न साकार करणे, आर्जव करणे, उसंत न मिळणे, भान ठेवणे, भिकेला लागणे)

**I.** परीक्षा जवळ आली की, मैदानावर जायला मुक्ताला वेळच मिळत नाही.

**II.** कलेक्टर बनून आनंदने आईबाबांचे स्वप्न पूर्ण केले.

**III.** विद्यार्थ्यांने प्रश्नपत्रिका सोडवताना वेळेची जाणीव ठेवली पाहिजे.

**IV.** बँकेचे कर्ज फेडता फेडता शेतकरी अगदी दरिद्री झाला.

**V.** रस्त्यावर भिक्षेकरी लोकांना पैशांसाठी विनवीत होता.

**प्रश्न 6. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे दया. (कोणतेही 4)** **(4 x 1= 4)**

**I.** वणव्यात कोण अडकेल, अशी भीती हरणीला वाटते?

**II.** हरघडी कविवर्य नारायण सुर्वे यांनी काय वाळविले नाही?

**III.** सैनिकांचे पाऊल कसे आहे?

**IV.** उद्योगाचे यंत्र कोणते मंत्र म्हणत आहेत?

**V.** पक्षिणी लगेचच धरणीकडे केव्हा झेपावते?

**VI.** डोळे भरून पाहावी, अशी दौड कोणती?

**ब) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही 4)** **( 4 x 1= 4 )**

**I.** अशा --- ज्योतींची तुझ्या मागून राखण.

A) अमर्याद B) असंख्य C) अनंत D) बेसुमार

**II.** ------- मी दास तुझा.

A) अंकिला B) सोबतीला C) भक्तीला D) सेवेला

**III.** भाकरीचा चंद्र शोधण्यातच -------- बरबाद झाली.

A) शेती B) आयुष्ये C) जिंदगी D) दुनिया

**IV.** हजार आम्ही ---- बळकट.

A) एकी B) समता C) एकता D) बंधुता

**V.** जीव ओवाळावा तरी जीव किती हा ----.

A) समान B) सान C) लहान D) महान

**क) खालीलपैकी एका काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. ( कोणतेही 1) (CBQ)** **( 1 x 3=3)**

**I.** 'मातीचे हो मंगल तनमन, चैतन्याचे फिरे सुदर्शन.'

**II.** 'काय करावें कळेना, नाही कष्टाचे सामर्थ्य.'

**प्रश्न 7. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 5) (CBQ)** **( 5 x 1=5)**

**I.** 'ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा कोणता अर्थ व्युत्पत्तीकोशात आला आहे?

**II.** लेखकाने विद्यार्थ्यांना कोणत्या संस्थेतील आपले अनुभव सांगितले आहे?

**III.** 'दिवाळी' या शब्दांची व्युत्पत्ती कोणत्या शब्दापासून झाली आहे?

**IV.** मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागचे कोणते कारण वरिष्ठांनी सांगितले आहे?

**V.** 'शहाणा' या शब्दाला मूळ अर्थाशिवाय व्युत्पत्तीकोशानुसार अजून कोणता अर्थ प्राप्त झाला आहे?

**VI.** माणसांतील कोणती प्रवृत्ती गेली पाहिजे, असे डॉ.भाभांनी सांगितले आहे?

**VII.** 'दार' हा प्रत्यय कोणत्या भाषेतील आहे?

## विभाग - ड – लेखन कौशल्य – 15 गुण

**प्रश्न 8 . अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 – 150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा. (कोणतेही 1 ) (CBQ) ( 5 x 1=5)**

**निबंधाविषय व मुद्दे**

**I.** श्रमाचे महत्त्व

[मुद्दे- श्रम म्हणजे काय?---- श्रमाने मिळणारे जीवनातील यश ----- श्रमाची गरीब व श्रीमंतांना आवश्यकता ---- आळस माणसाचा शत्रू ------ कोणतेही श्रम फुकट जात नाहीत ---- आधी कष्ट मग फळ...... श्रमातच ईश्वराचे दर्शन]

**II.** सूर्य मावळलाच नाही तर.....

[मुद्दे - उजेडच उजेड ---- पृथ्वीचे तापमान वाढेल ----- लोकांच्या वागणुकीत समानता नसेल ----- सजीवांवर घातक परिणाम ----- कालचक्र थांबेल.]

**III.** पृथ्वीचे मनोगत

[मुद्दे - धरती, पृथ्वी अशा विविध नावांनी ओळख ---- एक ग्रह --- वातावरण जीवसृष्टीसाठी आवश्यक ---- दिवस-रात्र तिच्या परिक्रमेने येतात ---- मानवामुळे त्रास ---- प्रदूषणाचे प्रमाण वाढले ---- तिचा नाश तर मानवाचाही नाश ---- तिची रक्षण करण्याची विनंती]

**किंवा**

**कथाविषय व मुद्दे – शीर्षक व तात्पर्य आवश्यक**

**I.** एक गावकरी ----- तीर्थयात्रेला जाणे ----- स्वतःजवळचे दागिने शेजारील सावकाराकडे देणे ---- गावकरी परत आल्यावर सावकाराचा दागिने देण्यास नकार ---- "दागिने उंदरांनी खाल्ले"----- गावकऱ्याने सावकाराच्या मुलाला लपवणे ----- "फुलपाखराने नेले" ----- सावकाराने चूक कबूल करणे ---- तात्पर्य

**II.** एक कोल्हा ---- निळ्या पाण्याच्या हौदात पडतो ----- संपूर्ण अंग निळे ----- काय करावे याचा विचार ---- युक्ती योजतो ----- जंगलात जातो ----- सर्व प्राण्यांना सांगतो, "देवाने मला तुमचा राजा म्हणून पाठविले आहे." ---- ओरडू लागतो ----- ते ओरडणे ऐकून ---- कोल्हा ओरडतो ---- शेवटी गुपित उघडकीस येते ----- सर्वांना आनंद ----- पळून जातो ---– तात्पर्य

**ब) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही 1)** **(CBQ)** **( 5 x 1=5)**

**I.** कल्पेश / कल्पना गोगटे, लोकमान्य टिळक विद्यालय, धामणगाव, येथून शालेय प्रतिनिधी या नात्याने, मा. आगार प्रमुख, राज्य परिवहन मंडळ, धामणगाव यांना पत्र लिहून शाळेच्या सहलीसाठी बस उपलब्ध करून देण्याविषयी मागणी करणारे पत्र लिहितो / लिहिते.

**II.** प्रथमेश / प्रतिमा पांचाळ, विद्यार्थी प्रतिनिधी, शाहू महाराज विद्यालय, सोलापूर. हा / ही मा. व्यवस्थापक, मयूर स्पोर्ट्स, विश्वास कॉलनी, सोलापूर. विद्यालयाकरिता मागवलेले क्रीडासाहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार करणारे पत्र लिहितो/लिहिते.

**क) खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. (कोणतेही 1)** **(CBQ)** **( 5 x 1=5)**

**I.** पर्यटक निवासाची जाहिरात तयार करा.

**II.** नवीन वर्षानिमित्ताने शाळेत रक्तदान शिबीर होणार असल्याने त्याची जाहिरात तयार करा.